सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्न

नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक संचालित

# कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर
# ता. सिन्नर जि. नाशिक

आणि

मराठी समाजशास्त्र संस्था संचालित

# मराठी समाजशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन

दिनांक १७ व १८ फेब्रुवारी २०२६

# ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने

स्थळ : कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर
ता. सिन्नर जि. नाशिक

## नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या काळात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेली स्वदेशी चळवळ ही राष्ट्रीय आत्मभान जागवणारी होती. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण आणि बहिष्कार या चतु:सूत्रीचा अवलंब करून देशभर शिक्षण क्षेत्रातही नवचैतन्य निर्माण झाले. त्याच प्रेरणेतून, फर्ग्युसन महाविद्यालयामधून शिक्षण घेऊन आलेल्या काही राष्ट्रभक्त तरुणांनी शि. रा. कळवणकर, रं. कृ. यार्दी, ल. पा. सोमण, शि. अ. अध्यापक आणि वा. वि. पाराशरे याच्या मार्गदर्शनाखाली दि. १ मे १९१८ रोजी शंकरराव कर्डिले यांच्या वाड्यात न्यू इंग्लिश स्कूल सुरू केले आणि त्याचवेळी ‘नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ’ या संस्थेची स्थापना केली. संस्थेचा उद्देश स्पष्ट होता की, राष्ट्रीय शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमानी, राष्ट्रभक्त पिढी घडवणे. आजही संस्कारक्षम व देशभक्त पिढी घडविण्याचे कार्य अव्याहतपणे चालू आहे.

शाळेची सुरुवात इयत्ता पहिली ते इयत्ता पाचवीपासून कर्डिले वाड्यात झाली. समाजाचा भरभरून प्रतिसाद मिळाल्याने शाळा लवकरच सिंदेकर वाडा आणि नंतर राजेबहादूर वाडा येथे स्थलांतरित झाली. संस्थेच्या संस्थापक सदस्यांनी अध्यापनासह संस्था उभारणीचे कार्य हिरीरीने पार पाडले. १९२४ साली श्रीमंत माधवराव देशपांडेच्या देणगीतून संस्थेसाठी जागा खरेदी केली. १९३२ साली १४ खोल्यांची पहिली इमारत बांधण्यात आली. पुढे १९३८ साली लोकसभेचे पहिले सभापती जी. व्ही. मावळणकर यांच्या हस्ते नूतन इमारतीचे उद्घाटन झाले. १९४३ साली रुंगटा बंधूनी दिलेल्या उदार देणगीतून शाळेचे नाव बदलून जुहारमल सरुपचंद रुगटा तथा जु. स. रुंगटा हायस्कूल ठेवण्यात आले. आज ही शाळा संस्था स्थापनेच्या सोबतीने १०८ वर्षांची झाली आहे.

संस्थेचा विस्तार नाशिक, नाशिकरोड, सिन्नर, इगतपुरी आणि नादगाव या संकुलामध्ये झाला आहे. आज ५२ शैक्षणिक केंद्रामध्ये बालवाडीपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत ज्ञानदानाची गंगा वाहते आहे. संस्थेने कौशल्य शिक्षण, उद्योजकता मार्गदर्शन, व्यावसायिक अभ्यासक्रम, संगीत महाविद्यालय, रात्रशाळा व रात्रमहाविद्यालय यासारखी शैक्षणिक केंद्रे सुरू केली आहेत. संस्थेचे एकूण ६ वरिष्ठ महाविद्यालये आहेत.

## मराठी समाजशास्त्र संस्था संचालित मराठी समाजशास्त्र परिषद

मराठी समाजशास्त्र परिषदेची स्थापना १९८३ मध्ये करण्यात आली. परिषदेच्या स्थापनेनंतर प्रत्येक वर्षी परिषदेचे अधिवेशन घेवून या अधिवेशनात विविध विषयावर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून चर्चा घडवून आणून समाज उपयोगी विद्यार्थीभिमुख, संशोधनात्मक बाबींवर विचारमंथन घडून यावे यादृष्टीने विचार मंथन झाले. यादृष्टीने मराठी समाजशास्त्र परिषदेचे पहिले अधिवेशन परिषदेला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाल्यानंतर दि. २८ ते ३० जून १९८४ मध्ये शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे घेण्यात आले. त्यानंतर प्रत्येक वर्षी मराठी समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र संस्था परिषदेने विविध महाविद्यालयांच्या मदतीने राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करीत असते. मराठी

समाजशास्त्र संस्था संचलित मराठी समाजशास्त्र परिषदेचे काम केवळ अधिवेशने घेण्यापर्यंतच मर्यादित राहू नये म्हणून मराठी समाजशास्त्र परिषदेची एक संशोधन पत्रिका असावी या संशोधन पत्रिकेतून समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी लेखन करावे यासाठी डिसेंबर १९८७ मध्ये 'समाजशास्त्र संशोधन पत्रिका' या नावाने संशोधन पत्रिकेची सुरुवात करण्यात आली आणि ही संशोधन पत्रिका नियमित प्रकाशित होत आहे. नाशिक शिक्षण प्रसारक मंडळ, नाशिक संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर ता. सिन्नर जि. नाशिक आणि मराठी समाजशास्त्र संस्था संचालित मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ व १८ फेब्रुवारी २०२६ रोजी मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३५ वे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. आपणास विनंती आहे की, हे आमंत्रण आपल्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि संयोजक अभ्यासकांच्या निदर्शनास आणून द्यावे. तसेच या अधिवेशनासाठी आपणाकडून उदंड प्रतिसाद मिळेल अशी आशा आहे. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा मुख्य विषय 'ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने' हा आहे.

## मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३५वे अधिवेशनासाठी उपविषय

'ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने' या मुख्य विषयाच्या अनुषंगाने व संशोधन समितीनुसार संशोधक व प्राध्यापकांनी खालील उपविषयावर आपले शोध निबंध पाठवावेत. संशोधन समिती व त्यांचे उपविषयः-

## संशोधन समिती ०१ : महाराष्ट्र सातत्य आणि परिवर्तन

**समन्वयक डॉ. सुधीर येवले,** ईमेल - msprc001@gmail.com, मो. नं. ९६८९०६६८४६

**शोधनिबंध उपविषय :** ग्रामीण परिवर्तनात महाराष्ट्रातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थामधील (महिला आणि आरक्षित गटनिहाय) आरक्षणाची भूमिका आणि त्या समोरील आव्हाने, महाराष्ट्राच्या ग्रामीण सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय परिवर्तनातील सहकार चळवळीची भूमिका, ग्रामीण विकासात रस्ते, वीज, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि डिजिटल कनेक्टिवीटीची आवश्यकता आणि कमतरता, विविध अशासकीय सामाजिक संस्थांचे (सेवाभावी संस्थांचे) ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासातील आणि परिवर्तनातील योगदान, महाराष्ट्रातील ग्रामीण स्थलांतराची कारणे, परिणाम आणि ग्रामीण-शहरी दरी कमी करण्याच्या विविध उपाययोजना आणि त्यासमोरील आव्हाने, शेतीवरील अवलंबित्व कमी होणेआणि ग्रामीण भागातील नवीन रोजगाराच्या संधी (उदा. कृषीआधारित विविध उद्योग, कृषी पर्यटन, सेवा क्षेत्र इत्यादी), जलसंधारण, सेंद्रिय शेती आणि हवामान बदलाचे ग्रामीण शेतीवरील परिणाम, ग्रामीण भागातील मोठे विकासात्मक प्रकल्प आणि विस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षणाची सद्यस्थिती, मुलींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण, विविध शासकीय योजनांची महाराष्ट्राच्या ग्रामीणसामाजिक परिवर्तनातील भूमिका, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण आणि निर्णय प्रक्रियेतील लोकांचा सहभाग, ग्रामीण भागातील जातीव्यवस्था, विवाहसंस्था आणि कुटुंब संस्थामधील परिवर्तन.

## संशोधन समिती ०२ : जागतिकीकरण आणि ग्रामीण विकास

**समन्वयक- डॉ. अनिल जायभाये,** ईमेल – msprc002@gmail.com, मो. नं. ८०१०७९५९८९

**शोधनिबंध उपविषय:** जागतिकीकरणाचे ग्रामीण विकासावरील परिणाम, जागतिकीकरणाचा ग्रामीण लघुउद्योगांवरील परिणाम, जागतिकीकरण आणि शेती उद्योग, जागतिकीकरण व शासकीय धोरण, जागतिकीकरण आणि शेतकरी आत्महत्या. जागतिकीकरण आणि शेती बी–बियाणे व औषधे. जागतिकीकरण आणि पशुपालन. जागतिकीकरण आणि बहुराष्ट्रीय कंपन्या. शेती आणि गॅट करार. जागतिकीकरण व शेतीवरील शासकीय अनुदान. जागतिकीकरण आणि शेतीमधील स्त्रियांचा सहभाग.

## संशोधन समिती ०३ : लिंगभाव असमानता आणि वर्जीततेचे प्रश्न –

**समन्वयक डॉ. अविनाश वर्धन,** ईमेल– msprc003@gmail.com, मो. नं. ९९६०३०४२५४

**शोधनिबंध उपविषय:** ग्रामीण महिलांची सामाजिक वर्जितता : कारणे व उपाय, लिंगाधारित श्रमविभाजन व मजुरी असमानता : ग्रामीण अभ्यास, ग्रामीण मुलींच्या शिक्षणातील अडथळे व लिंगभेद, ग्रामीण आरोग्यसेवांमध्ये महिलांच्या प्रवेशातील संरचनात्मक अडचणी, भूमिहीन ग्रामीण महिलांची आर्थिक वंचना व सशक्तीकरणाच्या संधी, दलित–आदिवासी ग्रामीण महिलांची बहुगामी वर्जितता : एक विश्लेषण, महिला आरक्षण आणि ग्रामपंचायत सहभाग : परिणाम व आव्हाने, ग्रामीण बालविवाहाचे लिंगभावीय परिणाम : समाजपरिवर्तनाचा अभ्यास, MGNREGA मधील महिलांचा सहभाग : अनुभव व परिणामकारकता, ग्रामीण डिजिटल दरी आणि महिलांची सामाजिक–आर्थिक वंचना, ग्रामीण महिलांविरुद्ध हिंसाचार : कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाय, NGO द्वारे ग्रामीण महिलांचे सशक्तीकरण : एक समाजशास्त्रीय मूल्यांकन, कृषीक्षेत्रातील महिलांचे अदृश्य श्रम : मान्यता आणि असमानता, ग्रामीण LGBTQ+ समुदायाची वर्जितता : सामाजिक संघर्ष व स्वीकृती, ग्रामीण स्थलांतरातील महिलांची दुहेरी वंचना : श्रम, सुरक्षा व कुटुंब.

## संशोधन समिती ०४: प्रसार माध्यमे आणि समाज

**समन्वयक डॉ. ज्योती गगनग्रास,** ईमेल– msprc004@gmail.com, मो. नं. ९८२२६५६३६२

**शोधनिबंध उपविषय :** ग्रामीण भागातील परिवर्तन आणि माध्यमांची भूमिका, ग्रामीण विकास आणि माध्यमे याचा सहसंबंध, समाज माध्यमे आणि ग्रामीण भागातील आव्हाने, समाज माध्यमे आणि ग्रामीण भागाचे अर्थकारण, ग्रामीण समाजावर माध्यमांचा प्रभाव, शेतकरी आत्महत्या आणि माध्यमे, माध्यमे आणि ग्रामीण व्यवसाय, प्रसार माध्यमे आणि ग्रामीण समाज, प्रसार माध्यमे : ग्रामीण समाज दशा आणि दिशा, ग्रामीण महिला सक्षमीकरण आणि माध्यमे.

## संशोधन समिती ०५ : नागरी समाज

**समन्वयक डॉ. रवींद्र वाघ,** ईमेल– msprc005@gmail.com, मो. नं. ९४२१८८६५००

**शोधनिबंध उपविषय :** नागरी समाज :– नागरी समाजाचा ग्रामीण समाजावरील वाढता प्रभाव, ग्रामीण व नागरी भेद, वाढते नागरीकरण, नागरीकरण आणि ग्रामीण स्थलांतर, नागरीकरण व ग्रामीण लोकसंख्या, नागरीकरणाचा ग्रामीण उद्योगांवरील प्रभाव, नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील परिणाम, नागरीकरण व ग्रामीण पायाभूत सुविधा, नागरीकरणाचा ग्रामीण विकासावरील प्रभाव, नागरीकरणाची ग्रामीण शिक्षण, आरोग्य, राजकारण, शासकीय धोरणे यातील भूमिका, ग्रामीण भागातील वाढते नागरीकरण.

## संशोधन समिती ०६ : कृषक समाज आणि स्थित्यांतरे

**समन्वयक डॉ. हरीश पेटकर,** ईमेल– msprc006@gmail.com, मो. नं. ९४०३६१८३७५

**शोधनिबंध उपविषय :** ग्रामीण समाज व कृषीव्यवस्था, ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप व कृषीव्यवस्था, आधुनिकीकरणांमुळे कृषीव्यवस्थे समोरील आव्हाने, आधुनिकीकरणाचा ग्रामीण कृषी विकासावर झालेला परिणाम, ग्रामीण समाजातील कृषीव्यवस्थेमध्ये महिलांचा दर्जा व भूमिका, ग्रामीण विकासामध्ये महिलांचे योगदान, ग्रामीण कृषि व्यवस्थेतील स्त्री पुरुष समानता, ग्रामीण समाज व एकल शेतकरी महिलांसमोरील आव्हाने, ग्रामीण समाज, कृषीव्यवस्था व युवकांचा सहभाग, ग्रामीण समाजातील कृषीव्यवस्था व युवकांची स्थित्यंतरे, कृषीव्यवस्था व ग्रामीण कौटुंबिक संरचनेचे बदलते स्वरूप, ग्रामीण कृषी व्यवस्थेकडे ग्रामीण सुशिक्षित बेरोजगाराचा बघण्याचा दृष्टिकोन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी उद्योग.

## संशोधन समिती ०७ : सामाजिक चळवळी व परिवर्तन

**समन्वयक डॉ. संपत काळे,** ईमेल msprc007@gmail.com, मो. नं. ८९९९७४४४८

**शोधनिबंध उपविषय:** ग्रामीण संकल्पना व बदलते स्वरूप आणि आजची आव्हाने, ग्रामीण भागातील पर्यावरणविषयक चलवळींचा अभ्यास, ग्रामीण समाजातील लोकांचे प्रश्न आणि विकासाचे धोरण, ग्रामीण विकास व पंचायत राज आणि राजकीय सहभागासाठीच्या चळवळी, गाव खेड्यातील जात, वर्ग व लिंगभाव समानतेच्या चळवळी, ग्रामीण भागातील शिक्षण, आरक्षण व युवकांची आजची स्थिती, स्थलांतर, बदलता गावगाडा, जातीची कोसळती उतरंड आणि आव्हाने, ग्रामीण भागातील रोजगाराचे प्रश्न सद्यस्थिती व परिवर्तन, शाश्वत ग्रामीण विकास आणि परिवर्तनाच्या प्रक्रिया, डिजिटल युगातील ग्रामीण भागासंबंधीच्या चळवळी.

## संशोधन समिती ०८ : नागरिकांची कर्तव्ये

**समन्वयक डॉ. नलिनी बोरकर,** ईमेल- msprc008@gmail.com, मो. नं. ९५१८९४३५२७

**शोधनिबंध उपविषय:** ग्रामीण विकासाची आव्हाने, ग्रामीण समाज आणि विकास : आर्थिक व सामाजिक दृष्टीकोन, ग्रामीण समाजाच्या परिप्रेक्षातून सामाजिक विकास व आव्हाने, ग्रामीण समाजाच्या परिप्रेक्षातून आर्थिक विकास व आव्हाने, ग्रामीण समाजाच्या परिप्रेक्षातून राजकीय विकास व आव्हाने, ग्रामीण समाजातील लिंगभावविषयक आव्हाने, ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप, ग्रामीण समाजातील लिंगभाव समानता : समस्या आणि आव्हाने, ग्रामीण समाजातील लिंगभाव रूढीबद्धता आणि स्त्रियांचे सक्षमीकरण, ग्रामीण समाजातील जात, वर्ग, धर्म या संदर्भातील आव्हाने, ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि मानवी हक्कांचा आदर, ग्रामीण समुदायातील शिक्षण आणि लिंग समानता.

## संशोधन समिती ०९ : हिंसा, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार

**समन्वयक- डॉ. विनोद खेडकर,** ईमेल- msprc0009@gmail.com, मो. नं. ९४२१५३७१२३

**शोधनिबंध उपविषय:** ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने, हिंसा, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराचा ग्रामीण विकासावर परिणाम, घरगुती हिंसा, महिला व बालकांवरील हिंसाचारातील वाढ, ग्रामीण गुन्हेगारीचे स्वरूप आणि कारणमीमांसा, ग्रामीण हिंसेचे पारंपरिक आणि आधुनिक स्वरूप, जमिनीच्या वादातून उद्भवणारी हिंसा, ग्रामपंचायत, स्थानिक प्रशासन आणि विकास योजनांमधील भ्रष्टाचार, तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि डिजिटल पेमेंटमुळे वाढणारे गुन्हे, ग्रामीण विकासाच्या योजनांवर गुन्हेगारी व भ्रष्टाचाराचा परिणाम, नागरीकरण व स्थलांतराचा ग्रामीण हिंसेवरील परिणाम, सायबर गुन्हेगारीचा ग्रामीण भागात वाढता प्रसार, स्त्री-पुरुष तस्करी, अवैध धंदे आणि नेटवर्क क्रिमिनलिटी, पोलिस व न्यायप्रणालीतील त्रुटींमुळे वाढणारी गुन्हे, पारंपरिक सत्ताकेंद्रे आणि संसाधन नियंत्रणामुळे होणारा भ्रष्टाचार, तंत्रज्ञानाच्या वापरामुळे ग्रामीण गुन्हेगारीचे नवे ट्रेंड.

## संशोधन समिती १० : सिमांतिक समूह

**(जात, जमात, अल्पसंख्याक, भटके-विमुक्त समुदाय आणि वर्ग) वर्जिततेचा प्रश्न**

**समन्वयक - डॉ. बाबुराव जाधव,** ईमेल- msprc0010srt@gmail.com, मो. नं. ९९७५८११०४१

**शोधनिबंध उपविषय:** समाजशास्त्रीय दृष्टीकोण, ग्रामीण-नगर सातत्य : सिमांतिक समूह (जात, जमात, अल्पसंख्यांक, भटके, विमुक्त समुदाय आणि वर्ग) यांच्या समायोजेनेचा आणि वर्जीततेचा प्रश्न. ग्रामीण समाजातील सिमांतिक समूहाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक जीवनाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने, ग्रामीण समाजातील जातीवाद आणि दलित अत्याचार, भटक्या विमुक्त समुदायातील महिलांच्या वर्जीततेचा

प्रश्न, ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप आणि सिमांतिक समूहाच्या सामाजिक चळवळी, सिमांतिक समूहातील, सामाजिक संबंध व नाते संबधाचे बदलते स्वरूप, सिमांतिक समूहातील पारंपारिक व्यवसायाचे बदलते स्वरूप आणि आव्हाने, ग्रामीण समाजातील सिमांतिक समूहाच्या परिवर्तनासाठी कार्ये करणाऱ्या विविध शासकीय आणि निमशासकीय संस्थांची भूमिका, ग्रामीण समाजातील सिमांतिक समूहाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनातील अडथळे, समस्या आणि आव्हाने.

## संशोधकांसाठी सूचना

सर्व संशोधन समित्यांकडे संशोधकांनी आपले शोध निबंध २५ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावे. या तारखेनंतर आलेले शोध निबंध पत्रिकेत समाविष्ट केले जाणार नाही. याची विशेष नोंद घ्यावी. शोध निबंधाचा गोषवारा २५० ते ३०० शब्दात असावा. संपूर्ण शोध निबंध जास्तीत जास्त २५०० शब्दापर्यंत मर्यादित असावा. शोधनिबंधासाठी फक्त मंगल युनिकोड फोन्ट वापरावा, इतर कोणत्याही फोन्ट मध्ये लिहिलेला निबंध स्वीकारल्या जाणार नाही. शोध निबंध लिहिताना गोषवारा, प्रस्तावना, पूर्व साहित्याचा अभ्यास, अध्ययनाचे उद्देश, गृहीतकृत्ये, अध्ययन पद्धती, तथ्यांचे विश्लेषण, निष्कर्ष, शिफारशी आणि संदर्भ सूची अशा क्रमात शोध निबंध असावा. शोधनिबंधासाठी संदर्भ हे **APA style 6th edition** मध्ये असावे. शोध निबंध **Word** फाईल संबंधित संशोधन समिती समन्वयकांच्या ईमेल वर पाठवावे. स्वीकृत शोधनिबंध मराठी समाजशास्त्र परिषद अधिवेशनाच्या अंकामध्ये प्रकाशित करण्यात येईल. शोध निबंधात काही त्रुटी आढळल्यास त्या दुरुस्त करण्याचा किंवा एखादा शोध निबंध नाकारण्याचा संपूर्ण अधिकार कार्यकारी संपादक यांना राहील.

## सभासदांकरिता नोंदणी फी

नोंदणी तपशील (खाली दिलेल्या कालखंडामध्ये नोंदणी केल्यास निर्धारित नोंदणी शुल्क आकारण्यात येईल)

| दिनांक | प्राध्यापक | | तासिका तत्वावरील प्राध्यापक / संशोधक विद्यार्थी | | सोबत येणारे व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| | निवासी | बिगर निवासी | निवासी | बिगर निवासी | |
| १५ जानेवारी २०२६ पर्यंत | ३००० | २५०० | २००० | १५०० | ३००० |
| १६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२६ | ३५०० | ३००० | २५०० | २००० | ३५०० |
| ११ ते १६ फेब्रुवारी २०२६ | ४००० | ३५०० | ३००० | २५०० | ४००० |
| १७ व १८ फेब्रुवारी २०२६ | ४००० | ३५०० | ३००० | २५०० | ४००० |

नोंदणी फी ऑनलाईन करता येईल. त्यासाठी फोन पे, गुगल पे, पेटीएम इत्यादींचा वापर करता येईल. नोंदणी फी खालील खात्यावर पाठवावी व पावतीची गुगल फॉर्ममध्ये सविस्तर माहिती देऊन संशोधन समिती समन्वयकांना पाठवावी आणि पावती प्रत जतन करून ठेवावी. कुटुंबासह येणाऱ्या व्यक्तींची व्यवस्था करण्यात येईल.

## नोंदणी फी साठी बँक माहिती :

खातेधारकाचे नाव: प्राचार्य, विनोद निरभवणे / एल.एच. साळोक

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा छत्रपती संभाजीनगर

अकाउंट नंबर : 60558851143

IFSC कोड – MAHB0000152

नोंदणी फॉर्म :– https://forms.gle/mhDF3Z1tvKXhNdcB6

मुख्य संपादक – प्रा. डॉ. लक्ष्मणसिंग साळोक, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद
मो. नं. ९५२७०७८८५५, ईमेल – salok.laxman@gmail.com

कार्यकारी संपादक – १) प्रा. डॉ. साहेबराव हिवाळे, मो. नं. ७५८८०४३८०४ ईमेल drsdhiwale@gmail.com
२) प्रा. डॉ. सुधीर येवले, मो. नं. ९६८९०६६८४६ ईमेल syevle6@gmail.com

## आपण सिन्नरला कसे याल ?

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणांपासून सिन्नर (नाशिक) ला येण्यासाठी एस.टी. महामंडळ, रेल्वे व खासगी वाहतूक सुविधा उपलब्ध आहेत. नाशिकमधील नाशिकरोड रेल्वे स्टेशनची सुविधा आहे. तसेच नाशिकरोड ते सिन्नर सीटी लिंक बसेसची सुविधा उपलब्ध आहे.

## नाशिक जिल्ह्यामधील प्रेक्षणीय स्थळे

**गोंदेश्वर मंदिर :-** गोंदेश्वर मंदिर हे नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे असलेले एक १२ व्या शतकातील हेमाडपंथी शैलीतील शिवमंदिर आहे, जे शौन (यादव) राजवंशाच्या काळात बांधले गेले आहे. हे मंदिर 'शैवापंचायतन' पद्धतीचे असून, मध्यभागी गोंदेश्वर (शिव) मंदिर आहे आणि सभोवताली पार्वती, गणपती, सूर्य आणि विष्णू यांची मंदिरे आहेत. या मंदिराला 'राष्ट्रीय संरक्षित स्मारक' म्हणून घोषित केले आहे.

**गारगोटी संग्रहालय :-** गारगोटी संग्रहालय हे महाराष्ट्र राज्यातील नाशिकजवळील सिन्नर शहरात एक संग्रहालय आहे ज्यामध्ये केसी पांडे यांनी ४० वर्षांपासून गोळा केलेल्या नैसर्गिक खनिजे आणि रत्नांच्या नमुन्यांचा संग्रह आहे. 'गोटी' हा शब्द दगड किंवा खडे या अर्थाच्या मराठी शब्दाचा संदर्भ देतो . हे भारतातील पहिले आणि एकमेव रत्न, खनिज आणि जीवाश्म संग्रहालय आहे. येथे जगातील भारतीय झिओलाइट खनिजे आणि स्फटिकांचा सर्वात मोठा

आणि उत्कृष्ट संग्रह देखील आहे.

**त्र्यंबकेश्वर :-** त्र्यंबकेश्वर हे शहर भारतातील सर्वात लांब नदी असलेल्या गोदावरी नदीच्या उगमस्थानी असलेले एक प्राचीन हिंदू तीर्थक्षेत्र आहे. त्र्यंबकेश्वर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एकाचे निवासस्थान आहे. येथे असलेल्या ज्योतिर्लिंगाचे विलक्षण वैशिष्ट्य म्हणजे मंदिरातील लिंग त्रिदेव, भगवान ब्रह्मा, भगवान विष्णू आणि भगवान शिव यांच्या तीन मुखी स्वरूपात आहे. सध्याचे त्र्यंबकेश्वर मंदिर तिसऱ्या पेशव्या बालाजी बाजीराव (१७४०-१७६०) यांनी जुन्या मंदिराच्या जागेवर बांधले होते. चारही बाजूंना प्रवेशद्वार आहेत, म्हणजे पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर. आध्यात्मिक संकल्पनांनुसार पूर्व दिशा सुरुवात दर्शवते, पश्चिम परिपक्वता दर्शवते, दक्षिण दिशा पूर्णता दर्शवते आणि उत्तर दिशा प्रकटीकरण दर्शवते.

**पंचवटी :-** पंचवटी नाशिकमधील एक पवित्र आणि ऐतिहासिक ठिकाण आहे, जिथे रामायण काळात राम, सीता आणि लक्ष्मण यांनी वनवास भोगला होता; हे ठिकाण पाच वटवृक्षांच्या समूहामुळे ओळखले जाते आणि येथे काळाराम मंदिर, सीता गुंफा, गंगा-गोदावरी मंदिर, तसेच नारोशंकर मंदिर यांसारखी अनेक महत्त्वाची मंदिरे आहेत, जी गोदावरी नदीच्या काठावर वसलेली आहेत आणि भाविकांना आकर्षित करतात.


**पांडवलेणी :-** सातवाहन काळातील ही लेणी इतिहास आणि स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. निसर्गरम्य ठिकाणी वसलेले पांडवलेणी आहे. पांडवलेण्याच्या पायथ्याशी दादासाहेब फाळके स्मारक आहे. स्मारकाच्या बाजूला तथागत भगवान गौतम बुद्धांचे भव्य बुद्धविहार आहे.

**इगतपुरी :-** इगतपुरी हे नाशिक जिल्ह्यातील एक सुंदर थंड हवेचे ठिकाण आणि हिल स्टेशन आहे, जे पश्चिम घाटात वसलेले आहे; हे ठिकाण पावसाळ्यात हिरवीगार निसर्गरम्यता, विपश्यना ध्यान केंद्र (धम्मगिरी), धबधबे आणि ऐतिहासिक स्थळांसाठी प्रसिद्ध आहे, तसेच मुंबई-आग्रा महामार्गावर असल्यामुळे पर्यटनासाठी लोकप्रिय आहे.

**सप्तशृंगी गड :-** सप्तशृंगी हा गड नाशिक जवळील नांदुरी गावाजवळ वसलेला असून हे सप्तशृंगी देवीचे तीर्थक्षेत्र नाशिकपासून ८० किलोमीटर अंतरावर आहे.

**कळसुबाईचे शिखर :-** कळसूबाईचे शिखर हे महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर आहे. कळसूबाई शिखराची उंची समुद्र सपाटीपासून १६४६ मीटर आहे, अहिल्यानगर जिल्ह्यात पश्चिम घाटाच्या रांगांमध्ये वसलेलं हे ठिकाण ट्रेकिंग प्रेमी, निसर्गप्रेमी आणि साहस शौकिनांसाठी स्वर्गासारखे आहे.

**शिर्डी देवस्थान :-** सिन्नर शहरापासून ६० किलोमीटर अंतरावर शिर्डी देवस्थान आहे.



अधिक माहितीसाठी संपर्क:

**समन्वयक**

प्र. प्राचार्य प्रा. डॉ. विनोद निरभवणे मो. ९९७५९१४७४३

**सहसमन्वयक**

प्रा. महेश शिंदे मो. ७०२०५४८१०३

**नोंदणी समिती**

प्रा. राजश्री बागुल मो. ८०८०३९४९३६

प्रा. धनश्री गांगुर्डे ९९२३७४२६७५

**निवास समिती**

प्रा. सुनिल गुरूळे मो. ७०२०५४८१०३

प्रा. गणेश राजगुरू मो. ७५०७८६४५७४

अध्यक्ष
प्रा.डॉ. लक्ष्मणसिंग साळोक

सचिव
प्रा. डॉ. कालिदास भांगे

कोषाध्यक्ष
प्रा. डॉ. प्रियदर्शन भवरे

उपाध्यक्ष
प्रा. डॉ. नानासाहेब पाटील

सहसचिव
प्रा. डॉ. वाल्मीक इंदासे

सदस्य
प्रा. डॉ. प्रशांत सोनवणे
प्रा. डॉ. प्रकाश काळवणे

**|| कार्यकारिणी सदस्य ||**

**डॉ. प्रशांत नारगुडे** मुंबई विद्यापीठ मुंबई, **डॉ. प्रकाश काळवणे** एस. एन. डी. टी. विद्यापीठ मुंबई **डॉ. सतीश देसाई** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. **डॉ. अनिल वानखेडे** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, **डॉ. जयमाला लांडे** (महिला प्रतिनिधी) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, **डॉ. राजू बुरीले** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर. **डॉ. प्रविण घोडेस्वार** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. **डॉ. प्रशांत सोनवणे** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव. **डॉ. पंढरी वाघ** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली. **डॉ. चंद्रकांत कांबळे** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर. **डॉ. नानासाहेब पाटील** - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. **डॉ. दिगंबर तंगलवाड** - महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा, **डॉ. वाल्मीक इंदासे,** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

संयोजक

प्रा. डॉ. विनोद निरभवणे,

प्रभारी प्राचार्य, कला व वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर आणि

समाजशास्त्र विभागप्रमुख,

कै. बिंदू रामराव देशमुख कला व वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालय, नाशिकरोड, नाशिक